# “महाराष्ट्रातील प्राचीन बौध्द लेण्यातील लोक कल्याणकारी संस्कृतीचे दर्शन : एक चिकित्सक अध्ययन”

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या मानवविज्ञान विद्याशाखे अंतर्गत इतिहास विषयातील Ph.D. पदवीच्या नियोजित संशोधनासाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा**

★ संशोधक ★

**जाधव धम्मशाल सुभाष**

★ मार्गदर्शक ★

**डॉ. कोंडेकर आर.एस.**

प्राध्यापक, इतिहास विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक

राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड

ता. मुदखेड, जि. नांदेड

★ संशोधन केंद्र ★

**पानसरे महाविद्यालय, अर्जापूर, ता. बिलोली, जि. नांदेड**

**सप्टेबर - 2022**

# महाराष्ट्रातील प्राचीन बौध्द लेण्यातील लोक कल्याणकारी संस्कृतीचे दर्शन : एक चिकित्सक अध्ययन

## 1. प्रस्तावना

संपूर्ण भारतात सर्वाधिक लेण्या ह्या महाराष्ट्रात आहेत. लेण्या, किल्ले व भव्य मंदिरे ही वास्तू कलेतील आश्चर्य आहेत. सर्वप्रथम लेणी निर्मित होत गेली. एखाद्या डोंगराचा अखंड पाषाण खोदून त्यात विहारे, दालने, मंदिरे, मुर्त्या, कोनाडे, स्तंभ, नक्षीकाम, वेलबुट्टया कोरल्या जात. लेण्यांची निर्मिती सर्वप्रथम बौध्द धर्मियांनी केली बौध्द भिक्षु, धर्म प्रसारक, धर्मपंडित, तत्त्वज्ञ यांचा शिष्य परिवार यांच्या निवासासाठी निवांत अध्ययन-अध्यापनासाठी तत्कालीन धर्मप्रिय व विद्याप्रिय समर्थ शासकाने या लेण्या तयार करुन घेतल्या, बहुतांश लेण्या गौतम बुध्दांच्या महापरिनिर्वाणानंतर झाल्या. इ.स. पूर्व सहावे शतक ते इ.स. पूर्व दुसरे शतक हाच बहुतेक लेण्या निर्मितीचा काळ असावा असे दिसते.

महाराष्ट्रातील बौध्द लेण्यांमध्ये तीन ठळक प्रकार दिसून येतात.

1. चैत्यगृह 2. विहार 3. बुध्द आणि बोधिसत्व आणि बौध्द देवता यांच्या मूर्ती असलेल्या गुहा त्याचप्रमाणे चैत्य, स्तुप, विस्तीर्ण दालने, विहार, मंडप, बुध्द जिवनातील प्रसंग, जातक कथा कोरलेल्या असतात.

अशा प्रकारची चैत्यगृहे, विहार हे बांधिव स्वरुपात उरलेल्या देशभरात निर्माण झाले होते. इ.स. पूर्व सहाव्या शतकापासून अशा प्रकारच्या विहारांची निर्मिती भारतात झाली होती. काही लेण्यात भिंतीच्या पृष्ठांवर छतांच्या अंतरंग चौकोणी, षटकोणी, अष्टकोणी स्तंभाच्या पृष्ठावर बुध्द जिवनातील प्रसंगाचे सुंदर चित्रे काढून रंगविलेली आहेत. यातून लोककल्याणकारी संस्कृतीचे दर्शन घडते. त्यामुळे मी **महाराष्ट्रातील प्राचीन बौध्द लेण्यातील लोक कल्याणकारी संस्कृतीचे दर्शन : एक चिकित्सक अध्ययन** हा विषय माझ्या संशोधन विषयासाठी निवडला आहे.

## 2. संशोधन निवडी बाबत

भारतातील एकूण लेण्यांची संख्या पाहता त्यापैकी अंदाजे ८० टक्के गुफा, लेण्या महाराष्ट्रात आहेत. या लेण्यांचे एक महत्त्वाचे वैशिष्टये म्हणजे धार्मिक वास्तू आहेत. विविध धर्माच्या आश्रय दात्यांनी त्या कोरण्यासाठी सढळ हातांनी दान-धर्म केला होता हे त्या लेण्यांवरुन समजते. त्यामध्ये सर्वात जास्त लेण्या बौध्द धर्मियांनी केलेल्या आहेत. त्यामधील चैत्यगृह, प्रार्थनास्थळ, विहार यांचा समावेश आहे.

महाराष्ट्रातील अग्निजन्य खडक हा अशा प्रकारच्या कोरीव कामासाठी अनुकुल होता. त्यामुळे भारतातील इतर राज्यांपेक्षा महाराष्ट्रात लेण्यांचे प्रमाण अधिक दिसते. यामध्ये अजिंठा लेणी, पितळखोरा लेणी, वेरुळ लेणी, नाशिक जवळील पांडव लेणी (त्रिरश्मी बौध्द लेणी), कारले लेणी, कान्हेरी लेणी, भाजे लेणी, बेडशे लेणी, कोंढाण्य लेणी, जुन्नर परिसरातील लेणी, वाई लेणी, ठाणाळे लेणी, कुडा लेणी, गांधार पाले लेणी, पांडवदरा लेणी, डोंगराई लेणी, आगाशिव लेणी, बिजासन लेणी, पोहाले लेणी अशा अनेक लेण्या महाराष्ट्रात पाहावयास मिळतात. त्या लेण्यातील शिल्प व चित्रांवरुन बौध्द तत्त्वज्ञान व त्यांचा उपदेश भावी पिढीला प्रेरणादायी ठरणारे असल्यामुळे मी माझ्या संशोधनासाठी हा विषय निवडला आहे.

## 3. संशोधनाची वैशिष्टये

1) प्राचीन बौध्द लेण्यातील कोरीव शिल्प व चित्रांचा शोध घेणे.
2) प्राचीन बौध्द लेण्यातील बौध्द तत्त्वज्ञान साहित्याचा शोध घेणे.
3) महाराष्ट्रातील प्राचीन बौध्द लेण्यातील बौध्द दर्शन काय सांगते याचा शोध घेणे.
4) महाराष्ट्रातील प्राचीन बौध्द लेण्यातून आपणाला मिळालेला उपदेश, तत्त्वज्ञान, शिल्प, चित्र यांच्यातून मिळालेला साठा यांचा शोध घेणे.

## 4. संशोधनाची गृहितके

1) प्राचीन बौध्द लेण्यातून सामाजिक सुधारणेस मिळालेले प्राधान्य.
2) प्राचीन बौध्द लेण्यातून समाजाला मिळालेली महत्वाची भुमिका.
3) प्राचीन बौध्द लेण्यातून शिल्पे व चित्रे यातून मिळालेले भगवान बुध्दांचे तत्त्वज्ञान समता, बंधुता प्रस्थापित करावयाचा आहे.
4) भगवान बुध्दांचा उपदेश काय सांगतो हे आपणाला प्राचीन बौध्द लेण्यांच्या शिल्पे व चित्रे यातून सांगितला आहे.

## 5. संशोधनाच्या मर्यादा

इ.स. पूव सहाव्या शतकापासून ते इ.स. आठव्या शतकापर्यंत कोरलेल्या महाराष्ट्रातील प्राचीन बौध्द लेण्यांचा अभ्यास करणे व लेण्यामध्ये असलेले बौध्द तत्त्वज्ञान व उपदेश समाजासमोर आणने ही विषयाची मर्यादा आहे.

## 6. पूर्व संशोधनाचा आढावा

संपूर्ण भारतात अनेक बौध्द, जैन व हिंदु लेण्या आहेत. त्यावर भरपुर संशोधन झालेले आहेत व होत आहेत. परंतु मी जो विषय निवडला आहे, त्या विषयावर अद्यापही संशोधन झालेले नाही. हा विषय प्रथमच नव्याने मी संशोधनाव्दारे पुढे आणीत आहे. या माध्यमातून भावी पिढयांना निश्चितच मोलाचे मार्गदर्शन होईल.

## 7. साधन चिकित्सा

**महाराष्ट्रातील प्राचीन बौध्द लेण्यातील लोककल्याणकारी संस्कृतीचे दर्शन : एक चिकित्सक अध्ययन** या संशोधन विषयासाठी महाराष्ट्रातील सर्व लेण्यावर स्वत: जाऊन संशोधन करणे, भेट देणे, पुरातत्व विभाग कार्यालयास भेट देणे व तेथे जाऊन शोध घेणे इत्यादींचा संशोधनासाठी वापर करणार आहे.

**8. संशोधन पध्दती**

माझ्या संशोधन पध्दतीसाठी मी ऐतिहासिक, वैज्ञानिक पध्दतीचा वापर करणार आहे. त्याचप्रमाणे लेणीवर स्वत: जाणे व पुरातत्व विभाग कार्यालय यांना भेट देणे संशोधनाच्या इतर पध्दतीही आहेत. परंतु वरील पध्दती माझ्या संशोधनासाठी अतिशय उपयुक्त आहे. म्हणून या संशोधन पध्दतीच्या आधारे मी संशोधन करणार आहे.

**9. संभाव्य प्रकरण योजना**

नियोजीत संशोधनाची पुढील एकूण सात प्रकरणे निश्चित केलेली आहेत.

**प्रकरण पहिले :- प्रस्तावना**

पाश्वभूमी, संशोधनाची उद्दीष्टये, संशोधनाची गृहितके, विषय निवडी बाबत, विषयाचे महत्त्व, संशोधन पध्दती, पूर्व संशोधनाचा आढावा, साधन चिकित्सा.

**प्रकरण दुसरे :- अजिंठा लेणीतील शिल्प आणि चित्रातून दर्शन**

1) अजिंठा लेणी
2) अजिंठा लेणीच्या चित्रातून विषय
3) अजिंठा लेणीतील चित्रकला
4) अजिंठा लेणीतील शिल्प
5) चैत्य लेणी

**प्रकरण तिसरे :- वेरुळ आणि पितळखोरा येथील चित्र व शिल्पातील विविध आंतररंगाचे प्रदर्शन**

1) वेरुळ लेणी
2) लेणीची सुरुवात
3) पितळखोरा लेणी
4) पितळखोरा लेणीची निर्मिती व काळ

5) पितळखोरा चैत्य क्रमांक 3

6) पितळखोरा चैत्य् क्रमांक 6

**प्रकरण चौथे:- कार्ले, भाजे आणि बेडसे या बौध्द लेणीतून मानवाच्या कल्याणासाठी दिलेला तथागत भगवान गौतम बुध्दांचा उपदेश**

1) कारले लेणी भोरघाटातील बौध्द लेणी

2) भाजे लेणी

3) बेडसे लेणी :- गुफा शिल्पकृती

4) बुध्दांची प्रलंबपाद आसनातील व्याख्यान मुद्रा

5) बुध्द लेणीतील उपदेश

6) चार आर्यसत्य्

**प्रकरण पाचवे :- नाशिक येथील पांडवलेणी (त्रिरश्मी बौध्द लेणी) आणि जुन्नर येथील विविध लेण्यातील बौध्द दर्शन**

1) नाशिक येथील पांडव लेणी (त्रिरश्मी बौध्द लेणी)

2) जुन्नर परिसरातील लेणी

3) जुन्नर शहरातील लेणी गुफा

**प्रकरण सहावे :- कान्हेरी, कोंढाण्य आणि कराड, सातारा लेणीतील तथागत गौतम बुध्दांचा उपदेश**

1) कान्हेरी लेणी

2) कोंढाण्य लेणी

3) कराड लेणी

4) सातारा लेणी

5) लेणीतील भगवान बुध्दांचा उपदेश

**प्रकरण सातवे :- पवणी, नाला/सोपारा, तेर येथील प्राचीन बौध्द स्तुप एक भगवान गौतम बुध्दांचे तत्त्वज्ञान आहे.**

1) तथागत भगवान गौतम बुध्दांचे तत्त्वज्ञान
2) गौतम बुध्दांचा उपदेश
3) माणूस हा केंद्र बिंदू
4) चार आर्यसत्य
5) आर्य अष्टांगिक मार्ग
6) नालागिरी जातक
7) बोधीसत्व वज्रपाणी
8) बोधीसत्व पद्मपाणी

**निष्कर्ष**

# संदर्भ ग्रथसुची

## इंग्रजी संदर्भसूची


| | | |
|---|---|---|
| 1) Ancient India's Valley Civilization | :- | Dr. John Marshall |
| 2) Origin and Development of Buddhism | :- | Dr. J.C. Pande |
| 3) Discerning The Buddha | :- | Dr. Lalmani Joshi |
| 4) Cave Temples of Indiam Part 1 | :- | James Ferqusson & Jaimes Burgess |

## संदर्भ ग्रथसुची

### इंग्रजी संदर्भसूची

| | | |
|---|---|---|
| 1) मराठवाडयाचा इतिहास | :- | डॉ. अनिल कठारे |
| 2) महाराष्ट्रातील लेणी | :- | प्रा. जोशी सु.ह. |
| 3) ऐतिहासिक पर्यटन | :- | डॉ. विजया साखरे |
| 4) अजिंठा बुध्द लेणी जागतिक वारसा | :- | प्रा. एस.आर. हणमंते |
| 5) बौध्द धम्म जिज्ञासा | :- | किर्ती पाटील |
| 6) भगवान बुध्दांचा मध्यम मार्ग | :- | मा.श. मोरे |
| 7) जातक अठ्ठकथा | :- | महाजन जातक भाग 6 |
| 8) महाराष्ट्राच्या क्षेत्रात बौध्द स्थापत्याचा इतिहास आणि सांस्कृतिक अध्ययन | :- | डॉ. बि.एन. कुऱ्हाडे |
| 9) अजिंठा | :- | राम अनंत थत्त |
| 10) प्राचीन भारताचा इतिहास आणि प्रियदर्शी अशोक (भाग दुसरा) | :- | डॉ. चित्रलेखा म. कळंबे |
| 11) पुरातत्व विद्या वस्तु संग्रहालय आणि पर्यटन | :- | डॉ. कठारे, डॉ. पाटील, डॉ. साखरे |
| 12) वेरुळ आणि औरंगाबाद बौध्द लेणी | :- | प्रा.एस.आर. हणमंते |
| 13) भारतीय कलेचा इतिहास | :- | डॉ. विजया साखरे |
| 14) लेणी महाराष्ट्राची | :- | डॉ. दाऊद दळवी |
| 15) मराठवाडा परिसरातील लेण्यातून प्रतिबिंबित संस्कृती | :- | बि.एन. कुऱ्हाडे |
| 16) सातवाहन आणि पश्चिमी क्षेत्रपांचा इतिहास | :- | डॉ. मिराशी |
| 17) महाराष्ट्रातील बौध्द धम्माचा इतिहास | :- | मा.श. मोरे |
| 18) देवळाचा धर्म धर्माची देवळे | :- | प्रबोधनकार ठाकरे |

| | |
|---|---|
| **संशोधक विद्यार्थी** | **मार्गदर्शक** |
| **जाधव धम्मशाल सुभाष** | **डॉ. कोंडेकर आर.एस**<br>प्राध्यापक, इतिहास विभाग प्रमुख व<br>संशोधन मार्गदर्शक राजीव गांधी महाविद्यालय,<br>मुदखेड, ता. मुदखेड, जि. नांदेड |